झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स-II, सेनापती बापट रोड, पुणे -१६
जा.क्र.झोपुप्रा/सप्रा-२/११३८ /२०२३
दिनांक :-१८/१० /२०२३.

## "जाहीर नोटीस"
## (झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करण्याची पूर्वसूचना)

प्रस्तावना-

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे सोयीकरीता **"उपरोक्त अधिनियम"** असा करणेत येत आहे) चे कलम ३ अ (१) (२) अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरीता गृहनिर्माण विभागाकडील अधिसूचना क्र.झो.पु.यो-२००४/प्र.क्र.-२१३/झो.प.सु-१ दि.३०/०६/२००५ नुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची नियुक्ती केली आहे. आणि,

१) ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना या प्राधिकरणाकडून तयार करण्यात आलेली आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मंजूरीने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि.०१/१२/२००५ रोजी अंतिमत: प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. आणि,

२) ज्याअर्थी, उपरोक्त उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार खालील अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याचे या कार्यालयाचे नियोजन आहे. आणि,

३) ज्याअर्थी, खालील अनुसूचीमध्ये नमूद केलेली मिळकत ग.व.नि. घोषित नसल्याचे दिसून येते. तथापि, उपायुक्त परिमंडळ क्र.१, पुणे महानगरपालिका यांनी त्यांचेकडील पत्र क्र.उआप१/४७, दि.२५/०४/२०१७ अन्वये सदर ठिकाणी झोपडपट्टी सदृश्य परिस्थिती असलेबाबतचा अहवाल या कार्यालयाकडे सादर केला आहे. तसेच, पुणे महानगरपालिकेकडील मान्य विकास आराखडा पाहता अनुसूचीमध्ये नमूद क्षेत्र हे "स्लम" झोनमध्ये समाविष्ट आहे. आणि,

४) ज्याअर्थी, खालील अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीचे मालमत्ता पत्रकानुसार एकूण क्षेत्र ३२१३१.४८ चौ.मी. इतके आहे. त्रिमितीय पद्धतीने केलेल्या परिगणनेनुसार ३३२७.३८ चौ.मी. इतके आहे व झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकरिता शासनाकडील विशेष नियमावलीतील नियम क्र.एसआर१२ (i) नुसार शासकीय जमीनीपोटी २५% अधिमूल्य रकमेच्या १०% अधिमूल्य रक्कम भरणा केलेले कमीत कमी क्षेत्र ३३००.०० चौ.मी. इतके आहे. असे उप अभियंता, तांत्रिक विभाग क्र.२ यांनी दि.०७/०९/२०२३ रोजीच्या अहवालाने स्पष्ट केले आहे. आणि,

५) ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) (सुधारणा), २०१७ मधील तरतूदी विचारात घेता झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करताना *"कोणतीही झोपडपट्टी योजना प्रसिद्ध झाल्यानंतर यथाशिघ्र, मुख्य कार्यकारी अधिकारी, कोणत्याही जमीनीच्या बाबतीत मग ती पूर्वी झोपडपट्टी क्षेत्र म्हणून घोषित झालेली असो किंवा नसो व ज्या सामुहिक आर्थिक कार्यक्षेत्राचा अंतर्भाव करता येईल ती जमीन झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित केले जाणे समर्थनीय ठरविणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्याची खात्री पटल्यावर कोणतीही सार्वजनिक प्राधिकरणे किंवा राज्य विधी मंडळाने अधिनियम केलेल्या कोणत्याही कायद्यान्वये गठीत केलेल्या राज्य शासनाच्या स्थानिकसंस्था यांसह जमीन मालकांना ३० दिवसांची नोटीस आणि त्यांचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे आणि त्यानंतर ४५ दिवसाच्या आत अशी जमीन झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करील"*, असे नमूद केले आहे. आणि,

६) ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) (सुधारित अधिनियम २०१७) चे कलम ३(क) नुसार 'झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र' म्हणून घोषित करणेकरीता मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा, पुणे हे सक्षम आहेत. आणि,

७) ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये नमूद क्षेत्रावर झोपडपट्टी असलेने सदरचे क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकामी समर्थनीय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३(क) च्या तरतुदीनुसार खालील अनुसूचीमध्ये नमूद केलेले क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषीत करण्याचे प्रस्तावित असून खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

आदेश :-

(१) अनुसूचीमध्ये नमूद क्षेत्र महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३(क) नुसार "झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र" म्हणून घोषीत करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

(२) अनुसूचीमध्ये निर्दिष्ट क्षेत्राचे जमीन मालक अथवा मालकी हक्क प्राप्त असलेल्या व्यक्ती/संस्था यांना त्यांच्या ज्या काही सूचना/हरकती असतील त्या ३० दिवसांचे आत लेखी स्वरूपात उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी क्र.२, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांच्याकडे सादर करण्यास फर्मविण्यात येत आहे. अशा सूचना व हरकती विचारात घेऊन या प्रकरणी ४५ दिवसांचे आत हे क्षेत्र उक्त कलमाखाली "झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र" म्हणून घोषित करण्याचा निर्णय मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे यांचे मार्फत घेण्यात येईल.

## अनुसूची

झोपडपट्टीचे नाव :- स.नं.८४ पै., शास्त्रीनगर, कोथरूड, पुणे
महानगरपालिका क्षेत्र :- पुणे महानगरपालिका.

| गाव- कोथरुड | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| स.नं./सि.स.नं./ फा.प्लॉ.नं. | जमीन/ भोगवटदाराचे हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | क्षेत्र (चौ. मी.) | योजनाक्षेत्राची चतु:सिमा (नभूअ१/अभू४/अतितातडी हद्दकायम मोरनं.९६४१/२०१४ दि.१०/०२/२०१४ रोजीच्या मोजणी नकाशानुसार) | | | |
| | | | पुर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| स.नं.८४ पै. | पुणे महानगरपालिका | ३३०० | सि.स.नं.७१९ (पैकी), कोथरुड पोलीस स्टेशन | लागू रस्ता | लागू रस्ता | लागू रस्ता |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह पारित करण्यात येत आहे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे
दिनांक :- १० / १० /२०२३

(नीलेश रं.गटणे) (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

प्रत-

१. मा.आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे यांना- माहितीस्तव सादर व उचित कार्यवाहीस्तव.
२. मा.जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे - यांना माहितीस्तव सादर.

D:\3 C\3c purvsuchana tippani & aadesh from july 2023\3c purvsuchana aadesh.docx6